# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:25.05.2026** **वार:सोमवार**

1. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रूबियो यांच्यात विविध मुद्दयांवर व्यापक चर्चा
2. नागपूरला देशातील प्रमुख लॉजिस्टिक्स केंद्र म्हणून ओळख मिळत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
3. राज्यातील 5 खासदारांसह 12 जणांना संसद रत्न पुरस्कार जाहीर आणि
4. राज्याच्या काही भागात मान्सूनपूर्व पावसाच्या सरी; तर काही भागात उष्णतेची लाट

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रूबियो यांच्यात काल नवी दिल्लीत विविध मुद्दयावर व्यापक चर्चा झाली. भारत-अमेरिका धोरणात्मक भागीदारी अधिक मजबूत करण्याचा पुनरुच्चार दोन्ही नेत्यांनी केला; त्याचबरोबर व्यापार, ऊर्जा, तसंच प्रादेशिक सुरक्षेसह अन्य महत्त्वाच्या क्षेत्रांतील सहकार्याचा त्यांनी आढावा घेतला. या चर्चेनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत डॉ. जयशंकर यांनी दोन्ही देशांतल्या व्यापार कराराला लवकर अंतिम स्वरूप देण्याची गरज व्यक्त केली, तसंच ऊर्जा व्यापारात झालेल्या विस्ताराचंही स्वागत केलं. भारत अमेरिकेसाठी महत्त्वाचा धोरणात्मक भागीदार असल्याचं सांगत, मार्को रुबियो यांनी, भारताचं महत्त्व अधोरेखित केलं.

**दरवाढ**

देशात पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींमध्ये प्रत्येकी प्रति लिटर अडीच रुपयांपेक्षा जास्त वाढ करण्यात आली आहे. गेल्या दहा दिवसातली ही चौथी दरवाढ आहे. त्यानुसार पेट्रोलच्या दरात प्रति लिटर 2 रुपये 61 पैसे तर डिझेलच्या दरात 2 रुपये 71 पैसे वाढ करण्यात आली आहे.

**लॉजिस्टिक-मुख्यमंत्री**

नवीन मालवाहतूक आणि पुरवठा धोरणामुळं नागपूर हे देशातील एक प्रमुख लॉजिस्टिक्स केंद्र म्हणून नावारूपाला येत आहे, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. ते काल नागपूरच्या निमजी गोंडखैरी परिसरात शंभर एकरांवर उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक लॉजिस्टिक्स पार्कचं उद्घाटन करताना बोलत होते. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या लॉजिस्टिक्स पार्क सुविधेमुळं उद्योग, उत्पादन क्षेत्र आणि पुरवठा साखळीला मोठा फायदा होणार असून मालवाहतुकीचा खर्च कमी करण्यावर सरकारचा भर आहे, असं सांगून मुख्यमंत्री म्हणाले.....

**आपल्याला जर ग्लोबली कॉम्पिटिटिव्ह व्हायचं असेल आणि ग्लोबल सप्लाय चेन चा भाग व्हायचा असेल तर लॉजिस्टिक्स ची कोस्ट कमी करणं हे महत्वाचं आहे. तेच काम आज आपण या माध्यमातून करतो आणि ते अतिशय वेगाने या ठिकाणी काम झालंय आणि विशेषतः हा जो समृद्धीचा एक्सटेन्शन आहे. याच्यामुळे संपूर्ण पूर्व विदर्भ जो आहे हा औद्योगिक दृष्ट्या अतिशय पुढारलेला होईल आणि त्यातनं लॉजिस्टिक्स ची कोस्ट मोठ्या प्रमाणात आपण कमी करू शकू आणि त्यातनं रोजगाराची निर्मिती खूप मोठ्या प्रमाणात होणार आहे. आज आपण बघितल लॉजिस्टिक पार्क मध्ये सगळ्यात जास्त रोजगार असतो. या सगळ्या गोष्टींच्या मागे आपला प्रयत्न हाच आहे की रोजगाराची संधी तयार झाली.**

**संसदरत्न**

यंदाच्या 'संसद रत्न' पुरस्कारांसाठी 12 खासदार आणि 4 संसदीय समित्यांची निवड झाली आहे. महाराष्ट्रातून मेधा कुलकर्णी, श्रीकांत शिंदे, हेमंत सावरा, स्मिता वाघ, आणि नरेश म्हस्के या खासदारांची या पुरस्काराच्या विविध श्रेणींमध्ये निवड झाली आहे. प्राईम पॉईंट फाउंडेशन या खासगी संस्थेद्वारे हे पुरस्कार देण्यात येतात. तसंच चरणजित सिंह चन्नी यांच्या अध्यक्षतेखालची कृषी समिती,

भर्तृहरी महताब यांच्या अध्यक्षतेखालची वित्त समिती, सप्तगिरी शंकर उलका यांच्या अध्यक्षतेखालची ग्राम विकास आणि पंचायती राज समिती आणि अनुराग ठाकूर यांच्या अध्यक्षतेखालची कोळसा आणि खाण समिती, या चार संसदीय समित्यांचीही या पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

**<u>जनगणना</u>**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात जनगणनेच्या कामाला सुरुवात झाली आहे. जनगणना कार्यालयांमार्फत 3 हजार 7 शे 97 प्रगणक आणि पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देण्यात आलं आहे. जनगणना अधिकारी, नागरिकांकडं कोणत्याही बँक खात्याची किंवा आधारकार्ड, पॅनकार्ड बाबतची माहिती मागत नाहीत, याची नागरिकांनी नोंद घ्यावी आणि अशा प्रकारची माहिती मागणा-या तोतयांपासून सावध रहावं, असं आवाहन महापालिकेच्या वतीनं करण्यात आलं आहे. त्याचप्रमाणं जनगणनेच्या कार्यात अडथळा आणणा-या आणि प्रगणकांना माहिती न देता कामात अडथळा निर्माण करणा-यांविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल असंही सूचित करण्यात आलं आहे.

**<u>पद्म पुरस्कार</u>**

राष्ट्रपती भवनात आज होणाऱ्या यावर्षीच्या पहिल्या नागरी पुरस्कार प्रदान सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू 66 पद्म पुरस्कार प्रदान करतील. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह इतर मान्यवर या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. या सोहोळयात, राष्ट्रपती दोन पद्मविभूषण, सहा पद्मभूषण आणि 58 पद्मश्री पुरस्कार प्रदान करणार आहेत. वर्ष 2026 साठी, राष्ट्रपतींनी पाच पद्मविभूषण, 13 पद्मभूषण आणि 113 पद्मश्री पुरस्कारांसह एकूण 131 पद्म पुरस्कार प्रदान करण्यास मंजुरी दिली आहे, उर्वरित पद्म पुरस्कार सोहळ्याच्या दुसऱ्या टप्प्यात प्रदान केले जातील.

**<u>CBSE</u>**

द्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ म्हणजेच CBSE ची पुनर्मूल्यांकन प्रक्रिया त्रुटीमुक्त करण्यासाठी त्यांना मदत करण्याकरिता, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी म्हणजेच आयआयटी मद्रास इथले प्राध्यापक आणि तांत्रिक तज्ञांच्या एका पथकाला पाठवण्याचे निर्देश, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिले आहेत. CBSE च्या निकालानंतरच्या सेवा पोर्टलबाबत विद्यार्थी आणि पालकांनी व्यक्त केलेल्या चिंता आणि घडामोडींच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

**<u>युपीएससी</u>**

केंद्रीय लोकसेवा आयोग म्हणजेच युपीएससीच्या नागरी सेवा पूर्व परीक्षा आणि भारतीय वन सेवा पूर्व परीक्षा काल सुरळीतरित्या पार पडल्या. देशभरातील 83 शहरांमधील दोन हजारांहून अधिक परीक्षा केंद्रांवर या परीक्षा घेण्यात आल्या. गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी परीक्षा केंद्रांवर उमेदवारांच्या रिअल-टाइम चेहरा प्रमाणीकरण या प्रणालीची अंमलबजावणी यंदा प्रथमच करण्यात आल्याचं युपीएससीनं सांगितलं.

**<u>ओबीसी-हाके</u>**

सध्या ओबींसीचं आरक्षण संपलं आहे. कुणबी दाखल्यामुळे मुळ ओबीसी राजकारणातून बाहेर फेकला गेला आहे. प्रस्थापितांकडून ओबीसींना भयभीत केलं जात आहे, तरीही सरकार आमचं ऐकून घ्यायला तयार नाही, त्यामुळे सरकार ओबीसींच्या बाबतीत आंधळ आणि बहिरं झालयं का, असा प्रश्न ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी उपस्थित केला आहे. ते काल सोलापूर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. सर्वच ठिकाणी ओबीसीत मराठा समाज दाखल झाला तर ओबीसींमधील चारशे जाती जमातींनी कुठे जायचं असा सवाल उपस्थित करत मुख्यमंत्र्यांनी ओबीसींच्या प्रश्नांची उत्तरं द्यावीत असंही हाके यावेळी म्हणाले.

**<u>आरोग्य आढावा</u>**

'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' हे केवळ एक शासकीय अभियान नसून, ग्रामीण भागाचा कायापालट करणारी चळवळ आहे, असं मत आरोग्य सेवा नागपूर मंडळाचे उपसंचालक डॉ. शशिकांत शंभरकर यांनी व्यक्त केलं. ते काल भंडारा जिहा परिषदेच्या सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय आढावा बैठकीत बोलत होते. यावेळी शासनाच्या सर्व आरोग्य योजनांच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

**<u>एव्हरेस्ट</u>**

रत्नागिरीचे जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते यांनी नुकतीच २३ मे रोजी पत्नी डॉक्टर सुप्रिया यांच्यासह एव्हरेस्ट बेस कॅम्पची मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली. रत्नागिरीचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गायकवाडही या मोहिमेत होते. सातपुते आणि गायकवाड या दोघांनी एव्हरेस्ट बेस कॅम्पवर राज्यघटनेची उद्देशिका प्रदर्शित केली.

**सोलापूर**

सोलापूरच्या श्री सिध्देश्वर तलावामध्ये काल सकाळी ऑक्सिजन अभावी पुन्हा शेकडो मासे मृत्युमूखी पडले. तलावातील पाणी शुध्द रहावे तसेच त्या पाण्यातील जलचरांना पुरेसा ऑक्सिजन मिळावा यासाठी महापालिकेच्या वतीने लाखो रुपये खर्च करुन एरियटर बसविण्यात आले आहेत. तरीही तलावातील मासे मृत्युमुखी पडले आहेत. गेल्या वर्षभरात जवळपास तीन वेळा मासे मृत्यूमुखी पडण्याची घटना घडली.

**पाऊस-नाशिक**

नाशिक जिल्ह्यात काल सलग दुसऱ्या दिवशी काही भागामध्ये जोरदार पावसानं हजेरी लावली. मालेगाव, निफाड आणि चांदवड या तीन तालुक्यांमध्ये काल पावसाने हजेरी लावली. या अवकाळी पावसामुळं शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. बदलत्या वातावरणामुळं आणखी काही दिवस वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे.

**अवकाळी-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काही भागात काल पहाटे पाचच्या सुमारास मान्सूनपूर्व पावसानं मेघगर्जनेसह हजेरी लावली. काही ठिकाणी वादळी वाऱ्यामुळे झाड पडून नुकसान झाल्याचा घटना घडल्या आहेत.जिल्ह्यात काल दिवसभर ढगाळ वातावरण होतं. कोकम पिकासाठी हा पाऊस धोक्याचा असल्यानं कोकम बागायतदार धास्तावले आहेत.

**समुद्रात बेपत्ता-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेंगुर्ले नजीक शिरोडा-केरवाडी इथली मच्छिमारी करण्यासाठी समुद्रात गेलेली बोट अचानक आलेल्या सोसाट्याच्या वादळी वाऱ्यामुळे उलटून बुडाली. या अपघातात बोटीवरील एकाच कुटुंबातील तिघांपैकी दोघे जण थोडक्यात बचावले असून, एक मच्छिमार समुद्रात बेपत्ता झाला आहे.

**उष्णता लाट**

राज्यात अमरावती,वर्धा आणि चंद्रपूर तसंच अकोला, नागपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांसाठी उद्यापर्यंत उष्णतेच्या तीव्र लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे. प्रादेशिक हवामान विभागानं बुलढाणा आणि वाशिम जिल्हे वगळता, विदर्भाच्या बहुतांश भागांत उच्च तापमान कायम राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी वीजांसह हलका पाऊस पडण्याची दाट शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.